REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 3 | DECEMBER - 2022

# एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट अंतर्गत महादेव कोळी जमातीचा सामाजिक व लोकसंख्यात्मक स्थितीचा आढावा

डॉ. स्वप्ना तुळशीराम संगमवार
एम.ए.(इतिहास), एम.फिल.



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत नांदेड, हिंगोली आणि परभणीचा समावेश होतो. या तीन जिल्ह्यांची विभागणी आदिवासी उपयोजना, म्हाडा पॉकेट आणि मिनी म्हाडा पॉकेट यामध्ये करण्यात आली. I.T.D.P. Kinwat at a Glance २००० नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्राचे क्षेत्रफळ ६०%, म्हाडा पॉकेट २६% तर मिनी म्हाडा पॉकेट १४% टक्के आहे. नांदेड जिल्ह्याचे आदिवासी भौगोलिक क्षेत्र १४५५ चौ.मी. आहे व त्याची नांदेड जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राशी तूलना केली असता, १३.८५% एवढी येते. परभणी जिल्ह्याचे आदिवासी भौगोलिक क्षेत्र ४२७ चौ.मी.आहे. त्याची परभणी जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राशी तूलना केली असता, ३.८७% येते. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. ६-७) या परिक्षेत्रात आंध, गोंड, भिल्ल, महादेव कोळी, मन्नेरवारलू, धनवर, हालबा, कातकरी, कोलाम, कोळी ढोर, कोळी मल्हार, नायकडा, परधान, पारधी, राजगोंड, ठाकूर इत्यादी तत्सम अनुसूचित जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. महाराष्ट्रात एकूण आपले वेगळेपण जपणाऱ्या ४७ अनुसूचित जमाती आहेत. अनुसूचित जमाती सुधारणा कायदा १९७६ नुसार क्षेत्रबंधन रद्द केल्यामुळे टी.एस.पी.क्षेत्रातील कोळी महादेव, मल्हार कोळी, ढोर कोळी, मन्नेरवारलू, ठाकूर, आंध, धनवर, हालबा, कातकरी, कोलाम, कोळी ढोर, कोळी मल्हार, नायकडा, परधान, पारधी, राजगोंड, गोंड, भिल्ल इत्यादी तत्सम जमातींना न्याय मिळाला आहे. त्यापैकी किनवट, कळमनुरी, औंढा नागनाथ, हदगाव, भोकर येथे आंध, गोंड, भिल्ल, परधान, राजगोंड, महादेव कोळी, मन्नेरवारलू, धनवर, हालबा, कातकरी, कोलाम, नायकडा, परधान मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत व कंधार-लोहा, मुखेड, बिलोली, देगलूर, गंगाखेड, पालम, पुर्णा, पाथरी, सेलू, जिंतूर व सेनगाव येथे महादेव कोळी, मन्नेरवारलू, ठाकूर इत्यादी तत्सम जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात वास्तव्य करतात. महादेव कोळी जमात ही शेकडो वर्षांपासून छोट्या गावात, वाडे, वस्त्यात, समूहा-समुहाने राहत होती. सुरुवातीला पूर्णतः रानावनातील फळे, कंदमुळे यावर अवलंबून असणारी ही जमात पुढे शेती व गुराढोरांच्या सान्निध्यात आली. इ.स.२०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यात २८१६९५ एवढी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे. त्यापैकी ७५००० लोकसंख्या महादेव कोळी या अनुसूचित जमातीची आहे. हिंगोली जिल्ह्यात ४६५८ एवढी महादेव कोळी जमातीची नोंद आहे. परभणी जिल्ह्यात १३६०७ एवढी लोकसंख्या फक्त महादेव कोळी अनुसूचित जमातीची आढळून येते. (जनगणना अहवाल २०११)

इ.स.१९९१ च्या जनगणनेप्रमाणे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये २४१ आदिवासी गावांच्या नोंदी झालेल्या आहेत. तर परभणीमध्ये ६९ गावांचा समावेश दाखवण्यात आलेला आहे. यामध्ये काही आदिवासी गावांच्या नोंदी झालेल्या आढळत नाहीत. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. ६) तसेच ४९% लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहते. म्हाडा पॉकेटमध्ये ३४% तर मिनी म्हाडा पॉकेटमध्ये १७% लोकसंख्येचे वास्तव्य आहे. या उपयोजना क्षेत्रात नांदेडच्या अनुसूचित जमातीच्या पुरुषांची साक्षरतेची टक्केवारी ५२.०८% व अनुसूचित जमातींच्या महिलांची १९.०८% एवढी आहे. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. ९) त्याचप्रमाणे परभणी जिल्ह्याच्या अनुसूचित जमातीच्या पुरुषांची टक्केवारी ५०.७२% आणि महिलांच्या टक्केवारीचे प्रमाण १५.७८% एवढे आहे. तसेच अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची घनता उपयोजना क्षेत्रात (T.S.P.) ४८% आहे. म्हाडा मध्ये ९१% आहे तर मिनी म्हाडामध्ये ९०% आहे. इ.स.१९९१ च्या जनगणनेप्रमाणे नांदेड जिल्ह्याची अनुसूचित जमातीची लोकसंख्या २७५९७२ एवढी आहे तर परभणी जिल्ह्याची १११४७० एवढी आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात ९९२३ एवढ्या घरांची संख्या नोंदवण्यात आली आहे. म्हाडामध्ये ७२२९ तर

मिनी म्हाडामध्ये ३१३६ एवढी नोंद आढळते. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीनिहाय दारिद्र्य रेषेखाली खालील जमाती आढळून येतात.

| **अ.क्र.** | **अनुसूचित जमातीचे नाव** | **एकूण घरांची संख्या** | **दारिद्र्य रेषेखालील घरांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १. | आंध | १३२५६ | ११७४८ | ८९ |
| २. | बैगा | १ | १ | १०० |
| ३. | भिल्ल | ४६५ | ४३४ | ९३ |
| ४. | धनवर | १४ | १३ | ९३ |
| ५. | दुबला | १ | १ | १०० |
| ६. | गोंड | ४२१२ | ३७१२ | ८८ |
| ७. | हलबा | २६ | १९ | ७३ |
| ८. | कातकरी | १२ | ८ | ६७ |
| ९. | खारिया | २ | २ | १०० |
| १०. | कोलाम | ७३९ | ५६५ | ७६ |
| ११. | कोळी ढोर | २७ | १८ | ६७ |
| **१२.** | **कोळी महादेव** | **४३१** | **३७७** | **८७** |
| १३. | कोळी मल्हार | १९ | १८ | ९५ |
| १४. | खोंड | २ | १ | ५० |
| १५. | कोरकू | ८ | ७ | ८८ |
| १६. | नायकडा | १०४ | ९९ | ९५ |
| १७. | ओरान | १४४ | ११३ | ७८ |
| १८. | परधान | ८११ | ६९० | ८५ |
| १९. | पारधी | ६ | ४ | ६७ |
| २०. | ठाकूर | १ | १ | १०० |
| २१. | थोटी | ६ | ६ | १०० |
| २२. | विठोलिया | १ | ० | ० |
| | **एकूण** | **२०२८८** | **१७८३७** | **८८** |

स्रोत : Income range for BPL is Rs. ११०००/-, BMS, Household report No. ९ .

या उपयोजना क्षेत्रात पक्की घरे १८% (मेंगलोर स्टाईल), झोपडीचे प्रमाण ५०% तर टीनशेडचे प्रमाण ३१% व आर.सी.सी.बांधकामाचे प्रमाण केवळ १% आहे. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. १३) जवळपास १७४९० स्वत:ची घरे आहेत व १६६६ लोक इंदिरा आवास योजनेच्या घरात राहतात, आणि ७६८ लोक किरायाच्या घरात राहतात. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. १४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ITDP At A Glance २०००) नुसार उपयोजना क्षेत्रात (टी.एस.पी.) १२ व टी.सी.पी.च्या बाहेर ७ अशा एकूण १९ आश्रमशाळा आहेत. अनुदानित आश्रमशाळा टीएसपी मध्ये ६ व टीएसपीच्या बाहेर १४ अशा २० आश्रमशाळा आढळून येतात. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. ३३)

महाराष्ट्रात आश्रमशाळेची एकूण संख्या ६५९ व पोस्टेबेसिक आश्रमशाळेची संख्या २५९ आहे. मराठवाड्यात आश्रमशाळांची संख्या ३५ व पोस्ट बेसिक आश्रमशाळा १६ आहेत. (आदिवासी क्षेत्र व लोकसंख्याबाबतची माहिती फेब्रुवारी १९९३)

**नांदेड जिल्हा शासकीय आश्रमशाळेतील एकूण अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या गोषवारा २०२०-२१**

| अ.क्र. | प्रकल्प | शासकीय आश्रम शाळेचे नाव | शाळेच्या वसतीगृहातील विद्यार्थी संख्या | | | डेस्कॉलर विद्यार्थी संख्या | | | शैक्षणिक सवलत घेणारी विद्यार्थी संख्या | | | एकूण विद्यार्थी संख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूणा | |
| १. | किनवट | पाटोदा | १९३ | १८६ | ३७९ | २४ | १२ | ३६ | ९ | ३ | १२ | २२६ | २०१ | ४२७ | |
| २. | | बोधडी | ० | ६५८ | ६५८ | ० | १९ | १९ | ० | ६४ | ६४ | ० | ७४१ | ७४१ | |
| ३. | | सारखणी | २३७ | २७७ | ५१४ | ८ | १५ | २३ | ४ | १३ | १७ | २४९ | ३०५ | ५५४ | |
| ४. | | जलधारा | २०७ | १८३ | ३९० | ५० | ३० | ८० | १९ | २१ | ४० | २७६ | २३४ | ५१० | |
| ५. | | सहस्रकुंड | १८२ | २५१ | ४३३ | ३ | ७ | १० | ३२ | २६ | ५८ | २१७ | २८४ | ५०१ | |
| ६. | | दुधड | १३९ | १७८ | ३१७ | ८१ | ७४ | १५५ | ८ | ८ | १६ | २२८ | २६० | ४८८ | |
| ७. | | किनवट | २०७ | १२८ | ३३५ | १ | ४ | ५ | ४ | ७ | ११ | २१२ | १३९ | ३५१ | |
| ८. | | मोहपूर | १४० | १७३ | ३१३ | ५ | २१ | २६ | २६ | ३२ | ५८ | १७१ | २२६ | ३९७ | |
| ९. | | एकथरी | १२६ | १४० | २६६ | २० | २० | ४० | ० | ० | ० | १४६ | १६० | ३०६ | |
| १०. | | केदारगुडा | १०३ | १४९ | २५२ | ११ | ५ | १६ | ० | ११ | ११ | ११४ | १६५ | २७९ | |
| ११. | | कुपटी | ८२ | ९६ | १७८ | ८ | १५ | २३ | ० | १ | १ | ९० | ११२ | २०२ | |
| १२. | | तलाईगुडा | १२३ | ९४ | २१७ | ० | ० | ० | १५ | १२ | २७ | १३८ | १०६ | २४४ | |
| १३. | | जवरला | ० | १७२ | १७२ | ० | ० | ० | ० | ७ | ७ | ० | १७९ | १७९ | |
| १४. | | उमरी बा. | १३० | ७० | २०० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३० | ७० | २०० | |
| १५. | | तुळशी | ९४ | ५४ | १४८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ९४ | ५४ | १४८ | |
| १६. | | माहूर | ८३ | ९८ | १८१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ८३ | ९८ | १८१ | |
| | | एकूण | २०४६ | २९०७ | ४९५३ | २११ | २२२ | ४३३ | ११७ | २०५ | ३२२ | २३७४ | ३३३४ | **५७०८** | |

(एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड, माहे सप्टेंबर अखेर गोषवारा २०२०-२१)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये १६ शासकीय आश्रमशाळा आहेत त्यात शासकीय आश्रमशाळा बोधडी येथे सर्वात जास्त ७४१ एस.टी.प्रवर्गाचे विद्यार्थी शिक्षण घेतात. सर्वात कमी एसटी प्रवर्गाचे विद्यार्थी १८१ हे माहूर येथे आहेत. नांदेड जिल्ह्यात २१ अनुदानित आश्रमशाळा आहेत.

**नांदेड जिल्हा अनुदानित आश्रमशाळेतील एकूण अनुसूचित जमातीची विद्यार्थीसंख्या गोषवारा २०२०-२१**

| अ.क्र. | शाळेचे नाव | तालुका | मंजूर विद्यार्थी संख्या | | | निवासी विद्यार्थी संख्या | | | अनिवासी विद्यार्थी संख्या | | | एकूण विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १. | खेरडा | किनवट | २५० | २५० | ५०० | १८६ | १९१ | ३७७ | १३ | ९ | २२ | १९९ | २०० | ३९९ |
| २. | उनकेश्वर | किनवट | ५०० | ५०० | १००० | ४०७ | ३२३ | ७३० | २० | २६ | ४६ | ४२७ | ३४९ | ७७६ |
| ३. | मांडवा | किनवट | १७५ | १७५ | ३५० | १४३ | १२६ | २६९ | ४ | ४ | ८ | १४७ | १३० | २२७ |
| ४. | चिखली | किनवट | ३०० | ३०० | ६०० | २५३ | २०९ | ४६२ | ४५ | २१ | ६६ | २९३ | २३० | ५२८ |
| ५. | इस्लापूर | किनवट | २५० | २५० | ५०० | १९५ | २०० | ३९५ | ७ | १० | १७ | २०२ | २१० | ४१२ |
| ६. | मुळझरा | किनवट | १७५ | १७५ | ३५० | १०५ | ९७ | २०२ | १ | २ | ३ | १०६ | ९९ | २०५ |
| ७ | भोकर | भोकर | २५० | २५० | ५०० | १९३ | २०५ | ३९८ | ६७ | ३६ | १२३ | २६० | २६१ | ५२१ |
| ८. | साळवाडी | भोकर | ५०० | ५०० | १००० | ४३० | ३६५ | ७९५ | ८२ | ३० | ११२ | ५१२ | ३९५ | ९०७ |
| ९. | सिताखंडी | भोकर | २५० | २५० | ५०० | १८६ | २०३ | ३८९ | १९ | १३ | ३२ | २०५ | २१६ | ४७१ |
| १०. | दिवशी | भोकर | २५० | २५० | ५०० | २१६ | १३९ | ३५५ | ० | १ | १ | २१ | १४० | ३५६ |
| ११. | भोसी | भोकर | २५० | २५० | ५०० | २०८ | १२३ | ३३१ | ४ | १ | ५ | २१२ | १२४ | ३३६ |
| १२. | बेंद्री | भोकर | २५० | २५० | ५०० | २११ | १६७ | ३७८ | १८ | १७ | ३५ | २२९ | १८४ | २१५ |
| १३. | जामदरी | भोकर | १७५ | १७५ | ३५० | ८८ | ९५ | १८३ | ७ | २ | ९ | ९५ | ९७ | १९२ |
| १४. | महादापूर | हि.नगर | २५० | २५० | ५०० | १७८ | १८६ | ३६४ | २२ | ११ | ४३ | २०० | २०७ | ४०७ |
| १५. | डोंगरगाव | मुदखेड | २५० | २५० | ५०० | २०३ | १९७ | ४०० | १४ | १४ | २८ | २१७ | २११ | ४२८ |
| १६. | चेनापूर | अर्धापूर | २५० | २५० | ५०० | १८२ | २१८ | ४०० | १२ | २९ | ४१ | १९४ | २४७ | ४४१ |
| १७. | मांजरम | नायगाव | २५० | २५० | ५०० | २०७ | १९३ | ४०० | २२ | १५ | ३२ | २२९ | २०८ | ४३७ |
| १८. | खानापूर | देगलूर | २५० | २५० | ५०० | २७७ | १२२ | ३९९ | ० | ० | ० | २७७ | १२२ | १९९ |
| १९. | खरबखंडगाव | मुखेड | २५० | २५० | ५०० | १२१ | २०६ | ३२७ | १ | ३ | ४ | १२२ | २०९ | ३५१ |
| २०. | बहाद्दरपूर | कंधार | २५० | २५० | ५०० | १९३ | १५५ | ३४८ | २ | १ | ५ | १९५ | १५८ | ३५७ |
| २१. | जानापूरी | लोहा | २५० | २५० | ५०० | ८४ | ६६ | १५० | १ | ० | १ | ८५ | ६६ | १५१ |

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड, माहे सप्टेंबर अखेर गोषवारा २०२०-२१

इ.स.२०२० पर्यंतची माहिती घेतली असता, सर्वात जास्त एस.टी.प्रवर्गाचे विद्यार्थी ७७६ उनकेश्वर येथे आहेत. तर सर्वात कमी विद्यार्थी १५० जानापूरी, ता.लोहा, जि. नांदेड येथील आश्रमशाळेत आढळून येतात. नांदेड जिल्ह्यातील १ ली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या ६७८० एवढी आहे. (माहिती अधिकार कायदा २००५ नुसार प्राप्त माहिती.)

**नांदेड जिल्ह्यातील आश्रमशाळामधील महादेव कोळी जमातीची विद्यार्थीसंख्या २०२०**

| अ. क्र. | आश्रमशाळेचे नाव | २०१५-१६ | | | २०१६-१७ | | | २०१७-१८ | | | २०१८-१९ | | | २०१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| १. | अनुदानित आश्रमशाळा मुळझरा, ता.किनवट | १ | २ | ३ | ३ | ३ | ६ | ४ | ५ | ९ | २ | २ | ४ | ३ | १ | ४ |
| २. | एकलव्य मॉडेल निवासी आश्रमशाळा सहस्त्रकुंड, ता.किनवट | - | १ | १ | ३ | २ | ५ | ११ | २ | १३ | १४ | ४ | १८ | २० | ५ | २५ |
| ३. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा केदारगुडा, ता.किनवट | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा किनवट | ४ | - | ४ | २ | - | २ | २ | - | २ | १ | - | १ | - | - | - |
| ५. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा उमरी (बा.), किनवट | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा तलाईगुडा किनवट | - | - | - | १ | १ | २ | - | - | - | - | १ | १ | - | १ | १ |

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | अनुदानित प्रा.मा.आश्रम शाळा खेरडा, ता.किनवट | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ८. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा एकघरी | १ | - | १ | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ९. | शासकीय माध्यमिक आश्रमशाळा जवराळा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १०. | शिवबाबा अनु.मा.आश्रम शाळा चिखली किनवट | १९ | ६ | २५ | १४ | ०४ | १८ | ०८ | ०४ | १२ | १२ | ०८ | २० | १२ | ०८ | २० |
| ११. | प्रियदर्शनी आदिवासी आश्रमशाळा कनिष्ठ महाविद्यालय उनकेश्वर | २३ | ३ | २६ | २३ | ३ | २६ | २० | - | २० | २५ | १ | २६ | १८ | २ | २० |
| | **एकूण** | ४२ | १८ | ६० | ४७ | १३ | ६० | ४ | ११ | ५६ | ५४ | १६ | ७१ | ५३ | १७ | ७० |

माहिती अधिकार कायदा २००५ नुसार प्राप्त माहिती, दि. २३.०३.२०२१.

वरील माहितीनुसार शासकीय माध्यमिक आश्रमशाळा केदारगुडा, उमरी (बा.), खेरडा, जव्हराळा येथे महादेव कोळी जमातीचा एकही विद्यार्थी प्रवेशीत नाही तसेच प्रियदर्शनी आदिवासी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय उनकेश्वर, ता.किनवट येथे दरवर्षी फक्त २५ ते २६ विद्यार्थीच प्रवेशीत आहेत.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट अंतर्गत शासकीय वसतिगृहांची २०१९-२०२० प्रवेशाबाबत विवरण तक्ता**

| **अ.क्र.** | **वसतीगृहाचे नाव** | **मंजुर प्रवेश क्षमता** | **इमारत प्रवेश क्षमता** | **पैकी प्रवेशित विद्यार्थी संख्या** | | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **जुने प्रवेशित** | **नवीन प्रवेशित** | **खास बाब** | **एकूण** | |
| १. | नांदेड क्र.१ | ७५ | १२५ | ५६ | ६६ | ३ | १२५ | |
| २. | नांदेड क्र.२ | ७५ | १२५ | ६४ | ५५ | ३ | १२२ | |
| ३. | मुलींचे नांदेड | ७५ | १२५ | ७१ | ५१ | ३ | १२५ | |
| ४. | भोकर | ७५ | ७५ | ३७ | ३० | १ | ६८ | |
| ५. | मुलींचे भोकर | ७५ | ७५ | ३३ | ३५ | ३ | ७१ | |
| ६. | हिमायतनगर | १२५ | १२५ | २३ | ६२ | ० | ८५ | |
| ७. | मुलींचे हि'नगर | १२५ | ७५ | ४२ | ४३ | १ | ८६ | |
| ८. | हदगाव | ७५ | ७५ | २८ | ३४ | २ | ६४ | |
| ९. | मुलींचे हदगाव | ७५ | ७५ | ३५ | ३१ | २ | ६८ | |
| १०. | माहूर | ७५ | ७५ | ३२ | २७ | ० | ५९ | |
| ११. | मुलींचे माहूर | ७५ | ७५ | २७ | ३१ | ० | ५८ | |
| १२. | किनवट | ७५ | ७५ | २६ | ४५ | ० | ७१ | |
| १३. | गोकुंदा पूर्व | ७५ | १२० | ५९ | ५३ | ० | ११२ | |
| १४. | गोकुंदा पश्चिम | ७५ | ७५ | ३१ | २८ | ० | ५९ | |
| १५. | मुलींचे किनवट | ७५ | १२० | ७१ | ४८ | १ | १२० | |
| | **एकूण** | **१२२५** | **१४१५** | **६३५** | **६३९** | **१९** | **१२९३** | |

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड वसतीगृह प्रवेश विवरण, इ.स.२०१९-२०२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये १२९३ विद्यार्थी अनुसूचित जमातीचे प्रवेशित आहेत पण महादेव कोळी जमातीचा एकही विद्यार्थी वसतीगृहात राहून उच्च शिक्षण घेताना आढळून आला नाही.(माहिती अधिकार कायदा २००५ नुसार)

I.T.D.P. Kinwat At A Glance कोरडवाहू जमीनधारक ४८% आहेत. ओलिताखालील २% तर कोरडवाहू व ओलिताखालील जमीनधारक ५% आहेत आणि जमीन नाही असे ४५% भूमिहीन कुटुंबे आहेत. त्यामुळे ४५% लोक शेतीवर मजूरी करतात व १% हे शासकीय व निमशासकीय नोकरीत आहेत आणि ४९% लोक शेती करतात. (ITDP Kinwat At A Glance २०००, P. ४४-४६) त्यात आंध, गोंड, भिल्ल, महादेव कोळी, मन्नेरवारलू, ठाकूर, नायकडा, बैगा, धनवर, हालबा, कातकरी, कोलाम, पारधी, कोळी मल्हार,

कोळी ढोर इत्यादी तत्सम जमातींचा समावेश आहे. कोरडवाहू जमीनी असल्यामुळे व हाताला काम नसल्यामुळे या उपयोजना क्षेत्रात स्थलांतर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. अनुसूचित जमातीनिहाय स्थलांतर खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | अनुसूचित जमातीचे नाव | निरीक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या | स्थलांतर केलेल्या कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | आंध | १३२५६ | ४९४७ | ३७ |
| २. | बैगा | १ | १ | १०० |
| ३. | भिल्ल | ४६५ | ७६ | १६ |
| ४. | धनवर | १४ | १ | ७ |
| ५. | दुबला | १ | ० | ० |
| ६. | गोंड | ४२१२ | ५१४ | १२ |
| ७. | हलबा | २६ | ५ | १९ |
| ८. | कातकरी | १२ | ५ | ४१ |
| ९. | खारिया | २ | २ | १०० |
| १०. | कोलाम | ७३९ | ४० | ५ |
| ११. | कोळी ढोर | २७ | ० | ० |
| **१२.** | **कोळी महादेव** | **४३१** | **८६** | **२०** |
| १३. | कोळी मल्हार | १९ | १ | ५ |
| १४. | खोंड | २ | १ | ५० |
| १५. | कोरकू | ८ | १ | १२ |
| १६. | नायकडा | १०४ | २७ | २५ |
| १७. | ओरान | १४४ | २७ | १८ |
| १८. | परधान | ८१ | ३१ | ३८ |
| १९. | पारधी | ६ | ४ | ६६ |
| २०. | ठाकूर | १ | १ | १०० |
| २१. | थोटी | ६ | २ | ३३ |
| २२. | विठोलिया | १ | ० | ० |
| | **एकूण** | **२०२८८** | **५८६७** | **२९** |

अशा रितीने आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवटच्या उपयोजना क्षेत्रात १ लाखाच्या वर महादेव कोळी जमातीचे बांधव अतिशय गरीब अवस्थेत जीवन जगताना दिसून येतात. जवळसपास ८७% महादेव कोळी जमातीचे बांधव दारिद्र्य रेषेखालील जवन जगत आहेत. या परिक्षेत्रात काम मिळत नसल्यामुळे महादेव कोळी जमातीचे २०% च्या वर त्यांचे स्थलांतर झाले आहे. या जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाणही नगण्य आहे. तसेच आश्रमशाळा व वसतीगृहाचा लाभ घेताना आढळून येत नाहीत. महादेव कोळी अनुसूचित जमात ही निसर्गपूजक असून, त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून शेतमजूर म्हणूनही मोठ्या प्रमाणात काम करताना आढळून येतात.

**संदर्भ :-**

१) Government of Maharashtra, Tribal Development Department, BMS Series ५(१४), ITDP Kinwat At a Glance २०००, Tribal Research & Training Institute, Maharashtra, Pune, ४११००१.
२) जनगणना अहवाल १९९१, २०००, २०११.
३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड माहे सप्टेबर २०११ अखेर गोषवारा २०२०-२१.
४) केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५.
५) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड वसतीगृह प्रवेश विवरण २०१९-२०.
६) पाठक अरूणचंद्र (संपा.), नांदेड जिल्हा गॅझेटियर, भाग १ व २, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, २०११
७) अनुसूचित जाती-जमाती क्षेत्रबंधन विधेयक सप्टेंबर १९७६.